साप्ताहिक

# निर्भीड वर्तमान

निडर लेखनी, निष्पक्ष बातमी.!

■ PRGI No. MAHMAR/2023/90686 संपादक : सौ. अश्विनी श्रीकांत दारोळे ■ Web : www.nirbhidvartmaan.com

■ वर्ष ३ रे ■ अंक ४ ■ शुक्रवार, दि. १ जानेवारी ते ७ जानेवारी २०२६ ■ मुल्य : २ रु ■ पाने ४







## २०८ वा शौर्यदिन: उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडून पेरणे फाटा येथील विजयस्तंभास अभिवादन

**पुणे (पेरणे फाटा):** ऐतिहासिक शौर्यदिनाचे औचित्य साधून राज्याचे उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी सकाळी पेरणे फाटा येथील ऐतिहासिक विजयस्तंभास पुष्पचक्र अर्पण करून अभिवादन केले. २०८ व्या शौर्यदिनानिमित्त आयोजित या सोहळ्यासाठी राज्यभरातून लाखो अनुयायी उपस्थित झाले आहेत.

**प्रमुख मान्यवरांची उपस्थिती**

या प्रसंगी उपमुख्यमंत्र्यांसोबत प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. यामध्ये प्रामुख्याने:

सुनील वारे: महासंचालक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी).

जितेंद्र डुडी: जिल्हाधिकारी, पुणे.

रंजन कुमार शर्मा: सह पोलीस आयुक्त.

गजानन पाटील: मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.

**मुख्यमंत्र्यांकडून निधीची तरतूद**

अभिवादन केल्यानंतर प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना अजित पवार म्हणाले की, दरवर्षीप्रमाणे राज्य शासनाच्या वतीने मी येथे नतमस्तक होण्यासाठी आलो आहे. हे अभिवादन केवळ वैयक्तिक नसून राज्यातील सर्व जनतेच्या वतीने आहे. या सोहळ्याच्या भव्य आयोजनासाठी आणि अनुयायांच्या सोयीसुविधांसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याच्या स्पष्ट सूचना प्रशासनाला दिल्या आहेत.

> “ शौर्यदिनाचा हा वारसा आपल्याला प्रेरणा देणारा आहे. अनुयायांना कोणताही त्रास होऊ नये, ही सरकारची प्राथमिकता आहे.
>
> **- अजित पवार, उपमुख्यमंत्री.**

**प्रशासकीय नियोजनाचे कौतुक**

शौर्यदिनानिमित्त होणारी अनुयायांची अलोट गर्दी लक्षात घेऊन जिल्हा प्रशासनाने यंदा जय्यत तयारी केली आहे. या नियोजनाबद्दल समाधान व्यक्त करताना उपमुख्यमंत्री म्हणाले की:

उत्तम नियोजन: पिण्याचे पाणी, आरोग्य सेवा, वीज आणि वाहतूक व्यवस्थेचे नियोजन चोख करण्यात आले आहे.

सुरक्षा व्यवस्था: गर्दीचे नियंत्रण करण्यासाठी पोलीस प्रशासनाने योग्य ती खबरदारी घेतली आहे.

अनुयायांची सोय: लांबून येणाऱ्या लोकांसाठी राज्य शासनामार्फत सर्व आवश्यक काळजी घेण्यात आली आहे.

## कोरेगावातील इतिहास हा जातीपातीच्या विरोधातील लढा : प्रकाश आंबेडकर

कोरेगाव भीमा : कोरेगाव भीमा येथे विजयस्तंभ अभिवादन कार्यक्रमासाठी शासनाकडून नागरिकांसाठी चांगली व्यवस्था करण्यात आली असून कोरेगावातील इतिहास हा मानवतेचा इतिहास आहे. येथील जातीपातीच्या विरोधातील लढ्यामुळे नव्या विचारसरणीची सुरुवात झाली आणि भारताच्या परिवर्तनाची सुरुवात झाली असल्याचे मत वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी व्यक्त केले.

कोरेगाव भीमा, ता. शिरूर येथे एक जानेवारी रोजी शौर्यदिनी अभिवादन करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू आणि वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर उपस्थित होते. यावेळी बोलताना, शासनाने येथे केलेल्या सुविधांबाबत त्यांनी समाधान व्यक्त केले.

अनुयायांना ने-आण करण्याची व्यवस्था उत्तम असून, पालिका निवडणुकीबाबत बोलताना त्यांनी सांगितले की, आमच्याकडून पक्षाच्या बाहेरील उमेदवारांना संधी देण्यात आलेली नाही आणि पक्षाच्या कार्यकर्त्यांनाच उमेदवारी देण्यात येणार आहे. मुंबई महापालिकेतील जागावाटपाबाबत काँग्रेसने आम्हाला जास्त जागा दिल्या, ज्या ठिकाणी काँग्रेसकडे सक्षम उमेदवार होते त्या जागा त्यांनी ठेवून दिल्या व ज्या ठिकाणी आमच्याकडे मजबूत उमेदवार होते त्या जागा आम्ही घेतल्या नाहीत, असेही वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी सांगितले.



# संपादकीय

## ‘इंडिगो’ची सद्दी संपणार?

महानगरपालिकांच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मंगळवार (३० डिसेंबर) ही अंतिम तारीख असून सर्वच राजकीय पक्षांनी बंडखोरी टाळण्यासाठी लपवाछपवीचा मार्ग स्वीकारला आहे. कारण त्यांच्यासमोर बंडोबांचे आव्हान कायम आहे. विशेष म्हणजे ही बंडखोरी सर्वपक्षीय आहे. मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीतही तेच चित्र आहे. सोमवारी उमेदवारांची यादी जाहीर होऊ लागल्यानंतर सर्वच राजकीय पक्षांत बंडखोरी उफाळून आली. त्यामुळे बंडखोरांची नाराजी दूर करण्याचे मोठे आव्हान राजकीय पक्षांसमोर उभे आहे. मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी सोमवारी दुपारनंतर काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (श. प.), ठाकरे सेना व मनसे यांनी आपले काही उमेदवार जाहीर केले. मात्र यात काही निष्ठावंत कार्यकर्त्यांना डावलले गेल्याने सर्वच राजकीय पक्षांतील इच्छुकांनी नाराजीचा सूर आळवला. राष्ट्रवादी काँग्रेसचे (श. प.) मुंबईतील जे मोजके माजी नगरसेवक होते, त्यातील मुंबई अध्यक्ष राखी जाधव, बबन कनावजे, धनंजय पिसाळ, मनीषा रहाटे या चारही माजी नगरसेवकांनी पक्षाला सोडचिठ्ठी देऊन दुस-या पक्षात प्रवेश केला. राखी जाधव यांनी भाजपचे कमळ हाती घेतले आहे. राखी जाधव यांनी भाजपात प्रवेश केल्याने भाजपची घाटकोपरमध्ये ताकद वाढली आहे. राखी जाधव २०१२ व २०१७ च्या निवडणुकीत प्रभाग क्रमांक १३१ मधून निवडून आल्या होत्या. मनसे नेत्या स्नेहल जाधव, भाजप नेत्या अर्चना पाटील यांनी ठाकरे सेनेत प्रवेश केला. ठाकरे सेनेचे चंद्रकांत वायंगणकर यांना उमेदवारी न मिळाल्याने त्यांचे कार्यकर्ते नाराज झाले आहेत. ठाकरे गटात प्रभाग क्र. ९५ च्या उमेदवारीवरून आमदार अनिल परब आणि वरुण सरदेसाई यांच्यात जोरदार खडाजंगी झाली. परब माजी नगरसेवक चंद्रकांत वायंगणकर यांच्यासाठी आग्रही होते, तर सरदेसाई यांनी दिवंगत नेते श्रीकांत सरमळकर यांच्या जावयासाठी अर्ज मागितल्याने परब संतप्त झाले. अखेर परब यांनी माघार घेतल्याने शास्त्री यांच्या नावावर शिक्कामोर्तब झाले. मात्र, या वेळी परब आणि सरनाईक यांच्यातील अंतर्गत मतभेद समोर आले. मुंबई महानगरपालिकेवर भगवा झेंडा फडकवण्यासाठी उमेदवारी जाहीर करताना भाजपने सावध भूमिका घेतली आहे. सोमवारी भाजपने ६६ उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली. मुंबई महापालिका निवडणुकीसाठी सुरुवातीला २२७ पैकी दीडशेहून अधिक जागा लढण्याची भाजपची तयारी होती. त्यामुळे एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेची कोंडी झाली होती. शिवसेनेने याबाबत नाराजी व्यक्त केल्यानंतर दोन्ही पक्षांत ८-१० दिवसांपासून बैठकांचे सत्र सुरू होते. अखेर भाजप आणि शिवसेनेत २०७ जागांवर एकमत झाले. भाजपच्या पहिल्या यादीत ठाकरेंच्या शिवसेनेला ‘जय महाराष्ट्र’ करत नुकताच भाजपात प्रवेश केलेल्या तेजस्वी घोसाळकर यांना प्रभाग क्र. १ मधून उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. तसेच भाजपचे माजी खासदार किरीट सोमय्या यांचे पुत्र नील सोमय्या यांना वॉर्ड क्र. १०७ मधून तिकिट देण्यात आले आहे. २०७ जागांपैकी १२८ जागा भाजप लढवणार आहे, तर शिवसेनेच्या वाट्याला ७९ जागा आल्या आहेत. अजून २० जागांवर दोन्ही पक्षांमध्ये तोडगा निघालेला नाही. मुख्यमंत्री फडणवीस यांचे निकटवर्तीय आणि भाजपचे माध्यम प्रमुख नवनाथ बन यांना मानखुर्द शिवाजीनगरच्या प्रभाग क्र. १३५ मधून उमेदवारी देण्यात आली आहे. युवा मोर्चा अध्यक्ष तेजिंदरसिंग यांना मुंबईतील वॉर्ड क्र. ४७ मधून उमेदवारी देण्यात आली आहे. मुंबई महापालिका निवडणुकीसाठी ठाकरे सेनेने सोमवारी सायंकाळपर्यंत अधिकृत उमेदवारांची यादी जाहीर न करताच निश्चित १२५ उमेदवारांना एबी फॉर्मचे वाटप केले. उमेदवार पळवापळवी टाळण्यासाठी ठाकरे सेनेने महायुतीला चकवा देत एबी फॉर्मचे गुपचूप वाटप केले. ठाकरे सेना १५० जागा लढवणार आहे म्हणे. मनसे ७० जागा लढवणार आहे. मुंबई महापालिकेसाठी काँग्रेसने सोमवारी ८७ उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली. या यादीत खासदार चंद्रकांत हंडोरे यांची कन्या प्रज्योती हंडोरे यांना प्रभाग क्र. १४० मधून उमेदवारी देण्यात आली आहे. तसेच आमदार अस्लम शेख यांच्या मुलाला आणि बहिणीला उमेदवारी देण्यात आली आहे. नाशिक व छत्रपती संभाजीनगर महापालिका निवडणुकीत महायुतीत बिघाडी झाली असून महायुतीतील घटकपक्ष आपल्या सोयीनुसार युती करून निवडणुका लढवणार असल्याचे चित्र आहे. संभाजीनगरमध्ये भाजपसोबत युती करण्याच्या प्रयत्नांना प्रतिसाद मिळत नसल्याने शिवसेना शिंदे गटात अस्वस्थता आहे. पालकमंत्री संजय शिरसाट म्हणाले, भाजप सकारात्मक प्रतिसाद देत नसेल तर एकनाथ शिंदे युतीसाठी पर्यायी मार्ग काढतील. शिवसेनेने ४१ जागांचा प्रस्ताव दिला होता. सुमारे ८-९ बैठका झाल्या तरी त्यातून ठोस मार्ग निघाला नाही. नाशिक महानगरपालिकेसाठी महायुतीचा जागावाटपाचा तिढा न सुटल्याने महायुतीत फूट पडली असून शिंदे आणि अजित पवार गट एकत्र लढणार असल्याचे राष्ट्रवादी अजित पवार गटाचे नेते नरहरी झिरवळ यांनी जाहीर केले. भाजपने घेतलेल्या निर्णयामुळे आम्हाला स्वतंत्र विचार करावा लागत आहे, असे ते म्हणाले. पुण्यात दोन राष्ट्रवादी एकत्रितरीत्या लढणार आहेत तर भाजप व शिवसेना शिंदे गटाची युती होण्याची शक्यता आहे. पुण्याच्या राजकारणात पक्षांतराचा जोरदार सामना सुरू आहे. काही दिवसांपूर्वी भाजपने राष्ट्रवादी काँग्रेसला दिलेल्या धक्क्याची परतफेड अजित पवारांनी केली आहे. भाजपच्या काही माजी नगरसेवकांना आणि पदाधिका-यांना त्यांनी सोमवारी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये जाहीर प्रवेश दिला. भाजपचे माजी नगरसेवक शंकर पवार, किरण बारटक्के, धनंजय जाधव यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. ठाकरे गटाचे माजी नगरसेवक अशोक हरणावळ, भाजपचे संदीप ज-हाड, सुनीता गलांडे यांनीही हातात घड्याळ बांधले. भाजपने बंडखोरीची शक्यता लक्षात घेऊन सोमवारी यादी जाहीर न करता उमेदवारांना एबी फॉर्मचे वाटप केले. पक्षाने अशा प्रकारे थेट फॉर्म दिल्याने इच्छुकांचा चांगलाच गोंधळ उडाला. पत्ता कट झालेल्या माजी नगरसेवकांनी पक्षाच्या नेत्यांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राजकीय पक्षांनी जागावाटप व उमेदवार जाहीर करण्यास जाणीवपूर्वक उशीर केल्याचे दिसते. बंडखोरी टाळण्यासाठी हा युक्तिवाद केल्याचे सांगण्यात येत असले तरी त्यामागची कारणे अधिक खोलवर आहेत. एकाच जागेसाठी अनेक इच्छुक, ऐनवेळी आयात उमेदवारांना दिली जाणारी तिकिटे आणि वर्षानुवर्षे पक्षासाठी काम करणा-या निष्ठावंतांना डावलले जाणे यामुळे नाराजी वाढली. पूर्वीसारखी पक्षांतर्गत शिस्त आज कुठल्याच पक्षात दिसत नाही. कुंपणावर असलेले नेते संधिसाधूपणे पक्षांतर करून तिकिट मिळवतात आणि त्यासाठी विकास व समाजसेवेचे गोंडस लेबल लावले जाते. शेवटच्या क्षणापर्यंत इच्छुकांना ‘कामाला लागा’ असा संदेश देत प्रचार व खर्चाची जबाबदारी त्यांच्यावर टाकली जाते. निर्णय मात्र मोजक्यांच्या हातात राहतो. परिणामी बंडखोरी होते. नाराजी दडपली जाते, पण ती नष्ट होत नाही!

## ‘इंडिगो’ची सद्दी संपणार?

भारतीय नागरी विमान वाहतूक क्षेत्रात लवकरच मोठी स्पर्धा पहावयास मिळणार आहे. केंद्र सरकारने तीन नवीन एअरलाईन्सना देशांतर्गत विमान सेवा सुरू करण्यास परवानगी दिली असून यामुळे प्रवाशांना प्रवासाचे नवीन आणि स्वस्त पर्याय उपलब्ध होणार आहेत. नागरी उड्डाण मंत्रालयाने ‘अल हिंद एअर’, ‘फ्लाय एक्स्प्रेस’ आणि ‘शंख एअर’ या कंपन्यांना ‘ना हरकत प्रमाणपत्र’ (एनओसी) जारी केले आहे. उत्तर प्रदेशातील ‘शंख एअर’ २०२६ मध्ये आपले कमर्शियल ऑपरेशन्स सुरू करू शकते. त्यांच्याकडे या पूर्वीच एनओसी उपलब्ध आहे. केरळच्या ‘अल हिंद ग्रुप’कडून ‘अल हिंद एअर’चे प्रवर्तन केले जात आहे तर ‘फ्लाय एक्स्प्रेस’च्या प्रवर्तनाबाबत अजून माहिती मिळालेली नाही. देशातील विमान वाहतूक क्षेत्राला चालना देण्यासाठी केंद्र सरकारने दोन नवीन एअरलाईन्सना परवानगी देण्याचा मोठा निर्णय घेतला आहे. सरकारच्या ‘उडान’ योजनेअंतर्गत स्टार एअर आणि फ्लाय-९१ यासारख्या लहान एअरलाईन्स आधीच कार्यरत आहेत. आता अल हिंद एअर, फ्लाय एक्स्प्रेस, शंख एअरमुळे टियर-२ आणि टियर-३ शहरांची हवाई जोडणी अधिक मजबूत होऊ शकेल. यामुळे प्रवाशांना अधिक पर्याय, स्पर्धात्मक भाडे आणि चांगली सेवा मिळेल, असा अंदाज आहे. सध्या देशांतर्गत विमान प्रवास करणा-या सुमारे ९० टक्के प्रवाशांकडून इंडिगो आणि टाटा समुहाच्या एअर इंडिया सेवांचा वापर केला जातो. अशा परिस्थितीत एखाद्या मोठ्या एअरलाईनमध्ये अडचण निर्माण झाल्यास संपूर्ण व्यवस्थेवर त्याचा परिणाम होतो. ही जोखीम कमी करण्यासाठी सरकारने नव्या एअरलाईन्सना परवानगी देण्याचा निर्णय घेतला आहे. काही दिवसांपूर्वी नेमके तसे घडले. देशातील सर्वात मोठी एअरलाईन इंडिगोच्या प्रणालीत बिघाड झाला आणि मोठा गोंधळ उडाला. इंडिगोने ऐनवेळी अनेक उड्डाणे रद्द केली आणि हजारो प्रवाशांना त्याचा फटका बसला. प्रवाशांना तासन्तास विमानतळावर बसावे लागले. अनेक जण आपल्या निर्धारित स्थळी पोहोचू शकले नाहीत. उड्डाणे रद्द झाल्याने तिकिटाचे पैसे परत मिळवण्यासाठी वाद झाले. या घटनेमुळे भारतीय विमान वाहतूक क्षेत्रात मोजक्या कंपन्यांचे वर्चस्व किती धोकादायक ठरू शकते ते स्पष्ट झाले. या पार्श्वभूमीवर सरकारने घेतलेला निर्णय योग्यच म्हणावा लागेल. सरकारने तीन नवीन विमान कंपन्यांना एनओसी दिली म्हणजे लगेच उद्यापासून या कंपन्यांच्या विमानातून प्रवास करता येईल, असे नाही. सरकारने या कंपन्यांना विमानसेवा सुरू करण्याची प्रक्रिया पुढे नेण्याची परवानगी दिली आहे. सरकारकडून एनओसी मिळाल्यानंतर या विमान कंपन्यांना नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाकडून (डीजीसीए) एअर ऑपरेटर प्रमाणपत्र (एओसी) घ्यावे लागेल. नंतर फ्लीट, क्रू, नेटवर्क आणि देखभालीबाबत तयारी करावी लागेल. या प्रक्रियेला अनेक महिने लागू शकतात. या प्रक्रियेत एअरलाईनची आर्थिक रणनिती आणि ऑपरेशनल क्षमता समाविष्ट केल्या जातात. भारतातील विमान वाहतूक बाजारपेठ वेगाने वाढत आहे. नव्या विमान कंपन्यांच्या समावेशामुळे अधिक सुविधा आणि चांगली कनेक्टिव्हिटी मिळेल. नवीन कंपन्यांच्या आगमनामुळे स्पर्धा वाढेल. विमानांची निवड करताना प्रवाशांकडे विविध पर्याय उपलब्ध असतील. नवीन विमान कंपन्यांना परवानगी देण्यामागे सरकारचे उद्दिष्ट इंडिगो आणि एअर इंडियावरील अवलंबित्व कमी करणे हे आहे. उत्तर प्रदेशस्थित शंख एअरलाईन्स २०२६ च्या पहिल्या तिमाहीत सुरू होण्याची अपेक्षा आहे. पुढील ३ वर्षात या एअरलाईन्सच्या ताफ्यात २० ते २५ विमाने राहतील, अशी अपेक्षा आहे. देशातील प्रमुख शहरे आणि राज्यांमधील कनेक्टिव्हिटी सुधारण्याचे शंख एअरचे उद्दिष्ट आहे. अल हिंद ही केरळस्थित अल हिंद ग्रुपच्या मालकीची आहे. या एअरलाईनचे ध्येय प्रादेशिक आणि कमी किमतीची कनेक्टिव्हिटी प्रदान करणे आहे त्यामुळे सामान्य व्यक्तीसाठी विमान प्रवास परवडणारा बनू शकतो. देशात फ्लाय एक्स्प्रेस सुरू झाल्यानंतर कच्च्या मालापासून ते तयार उत्पादनापर्यंत सर्व काही व्यावसायिक उद्देशाने वाहतूक करणे सोपे होईल. देशांतर्गत हवाई कार्गोच्या वाढत्या मागणीच्या पार्श्वभूमीवर ही विमान कंपनी प्रवासी उड्डाणांसाठी एक व्यवहार्य पर्याय म्हणून काम करू शकते. सध्या भारतीय विमान वाहतूक बाजारपेठेच्या सुमारे ९० टक्के हिश्श्यावर इंडिगो आणि एअर इंडिया समुहाचे वर्चस्व आहे. एकट्या इंडिगोचा बाजारपेठेतील हिस्सा ६५ टक्क्यांपेक्षा जास्त आहे. या दोन बड्या कंपन्यांच्या मक्तेदारीमुळे प्रवाशांना अनेक वेळा मर्यादित पर्यायांचा सामना करावा लागतो. गत काही वर्षात ‘गो फर्स्ट’ आणि ‘जेट एअरवेज’सारख्या कंपन्या आर्थिक संकटामुळे बंद पडल्याने या क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली होती मात्र आता नवीन कंपन्या आल्याने विमान वाहतूक क्षेत्रात उत्साहाचे वातावरण आहे. वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी आणि प्रवाशांना दर्जेदार सुविधा देण्यासाठी देशात विमान ऑपरेटरची संख्या वाढवणे हे सरकारचे मुख्य उद्दिष्ट आहे. नागरी विमान वाहतूक मंत्री राम मोहन नायडू म्हणाले, भारतीय आकाशात जास्तीत जास्त कंपन्यांना प्रोत्साहन देणे हे आमचे ध्येय आहे त्यामुळे प्रवाशांना उत्तम सेवा आणि वाजवी दरात तिकिटे मिळतील. सरकारचा हा निर्णय कनेक्टिव्हिटी सुधारण्यासाठी क्रांतिकारी ठरू शकतो. प्रवाशांचा फायदा होणार आहे तसेच स्पर्धा वाढल्यामुळे विमान प्रवासाचे दर नियंत्रणात राहतील. कनेक्टिव्हिटी सुधारेल आणि देशातील दुर्गम भागातील शहरांना विमान सेवेने जोडणे सोपे होईल. परवाना मिळालेल्या कंपन्यांना आता विमानांची खरेदी, पायलट-कर्मचा-यांची भरती आणि मोठे नेटवर्क उभारण्यासाठी प्रचंड भांडवलाची गरज भासणार आहे. या कंपन्यांना पुढील काही महिने तांत्रिक आणि आर्थिक बाबींची पूर्तता करावी लागेल. यात विमान देखभाल, वैमानिकांचे प्रशिक्षण आणि रूट मॅपिंगचा समावेश असेल. या प्रक्रियेनंतरच या कंपन्यांची विमाने प्रत्यक्ष आकाशात झेप घेतील. सरकारच्या निर्णयामुळे केवळ मोठ्या शहरांनाच नव्हे तर ग्रामीण भागालाही हवाई नकाशावर स्थान मिळेल. भारताचे विमान वाहतूक क्षेत्र जगातील अन्य कोणत्याही देशापेक्षा अधिक वेगाने विस्तार पावत आहे त्यामुळे अधिक कंपन्या सामावून घेण्याची या क्षेत्राची क्षमता आहे.

## ‘बाहुबली’चे यशस्वी उड्डाण

भारतीय अवकाश संशोधन संस्था ‘इस्रो’ने ६ हजार १०० किलो वजनाच्या उपग्रहाचे अवकाशात यशस्वी प्रक्षेपण करून नवा इतिहास निर्माण केला आहे. इस्रोच्या ‘बाहुबली’ अग्निबाणाच्या सहाय्याने हे प्रक्षेपण बुधवारी सकाळी ८ वाजून ५५ मिनिटे ३० सेकंदांनी श्रीहरीकोटा येथील प्रक्षेपण केंद्रावरून करण्यात आले. या उपग्रहाचे नाव ‘ब्ल्यूबर्ड ब्लॉक-२’ असे आहे. इस्रोने आतापर्यंत प्रक्षेपित केलेल्या उपग्रहांमध्ये हा सर्वाधिक वजनाचा आहे. हा उपग्रह दूरसंचार सेवेसाठी असून तो निम्नकक्षेत परिभ्रमण करणारा सर्वांत वजनदार उपग्रह आहे. या उपग्रहाची निर्मिती अमेरिकास्थित ‘एएसटी स्पेसमोबाईल’ या खासगी कंपनीने केली आहे. इस्रोचे ‘एलव्हीएम ३-एम-६’ या अग्निबाणाने या उपग्रहाला पूर्वनिर्धारित कक्षेत सुस्थिर केले आहे. या अग्निबाणाच्या श्रेणीला ‘बाहुबली’ असे संबोधले जाते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या महत्त्वपूर्ण कामगिरीसाठी इस्रोचे अभिनंदन केले असून इस्रोचे हे यश आत्मनिर्भर भारतासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे असे आपल्या संदेशात म्हटले आहे.

पूर्वनिर्धारित कार्यक्रमानुसार या उपग्रहाचे प्रक्षेपण बुधवारी सकाळी ८ वाजून ५४ मिनिटांनी केले जाणार होते. परंतु अवकाशातील परिस्थिती अनुकूल नसल्याने प्रक्षेपण ९० सेकंद विलंबाने करण्यात आले. अवकाशात उपग्रह प्रक्षेपणाच्या मार्गात ‘अवकाश कचरा’ आढळल्याने तो दूर होईपर्यंत प्रक्षेपण लांबविण्यात आले होते. इस्रोची व्यापारी शाखा ‘न्यू स्पेस इंडिया लिमिटेड’ आणि अमेरिकेची खासगी उपग्रह निर्मिती कंपनी ‘एएसटी स्पेस मोबाईल’ यांच्यात झालेल्या करारानुसार या उपग्रहाचे प्रक्षेपण करण्यात आले आहे. या उपग्रहाचे यशस्वी प्रक्षेपण करून इस्रोने आपला पूर्वीचा विक्रम मोडीत काढला आहे. यापूर्वी इस्रोने ४ हजार ४०० किलो वजनाच्या उपग्रहाचे यशस्वी प्रक्षेपण केले होते. या नव्या उपग्रहात अत्यंत आधुनिक अशी दूरसंचार साधने स्थापित करण्यात आली असून त्यामुळे मोबाईलवरून संपर्क साधण्यासाठी जमिनीवर मनोरे(टॉवर्स) असण्याची गरज नाही. मनोराविरहित संपर्क यामुळे शक्य होणार आहे.

तसेच व्हीडीओ कॉल करण्यासाठीही हा उपग्रह उपयुक्त ठरणार आहे. या उपग्रहामुळे ४ जी आणि ५ जी ध्वनी आणि व्हीडीओ कॉल्स शक्य होणार आहेत. स्पेसमोबाईल या खासगी कंपनीने एक महत्त्वाकांक्षी योजना आखली असून या योजनेमुळे मनोराविरहित संपर्क शक्य होणार आहे. ही कंपनी ‘आकाशाधारित’ (स्पेस बेस्ड) सेल्युलर ब्रॉडबँड नेटवर्कची स्थापना करणार आहे. हे नेटवर्क व्यापारी आणि प्रशासकीय उपयोगासाठी असेल. तसेच ते ४ जी आणि ५ जी कॉल्स, संदेशवहन, स्ट्रीमिंग आणि विदासेवा (डाटा सर्व्हिस) यांच्यासाठी उपयुक्त असेल. भारताच्या अवकाश क्षेत्रातील कामगिरीतले हे भरीव यश आहे. भारताच्या अवकाश प्रवासातील हा देदीप्यमान क्षण आहे. या उपग्रहामुळे अवकाशातून सामान्य स्मार्टफोनवर थेट हाय-स्पीड इंटरनेट प्रवेश मिळेल. ब्ल्यूबर्ड ब्लॉक-२ हा एएसटी स्पेसमोबाईलच्या पुढील पिढीतील संप्रेषण उपग्रह मालिकेचा एक भाग आहे. हा उपग्रह जगभरातील अशा भागात मोबाईल कनेक्टिव्हिटी प्रदान करण्यासाठी डिझाईन केला आहे जिथे ग्राऊंड नेटवर्क प्रवेश करण्यायोग्य नाही. या उपग्रहात २२३ चौरस मीटर (सुमारे २४००चौरस फूट) फेजड् अॅरे अँटेना आहे. ज्यामुळे तो पृथ्वीच्या कक्षेत कमी अंतरावर तैनात केलेला सर्वात मोठा व्यावसायिक संप्रेषण उपग्रह बनला आहे. हा उपग्रह सुमारे ६०० किलोमीटर उंचीवर पृथ्वीच्या कक्षेत तैनात केला जाईल. याआधी एलव्हीएम ३ ने चांद्रयान-२, चांद्रयान-३ आणि दोन वनवेब मोहिमा (एकूण ७२ उपग्रह) यशस्वीरीत्या प्रक्षेपित केल्या आहेत. हे रॉकेट भारताच्या अंतराळ क्षमतेचे प्रतीक आहे आणि भविष्यातील गगनयान मानवयुक्त मोहिमेसाठी देखील वापरले जाणार आहे. हे मिशन इस्रोच्या व्यावसायिक प्रक्षेपणासाठी एक नवीन मैलाचा दगड ठरेल. एएसटी स्पेसमोबाईल जगातील पहिले अंतराळ-आधारित सेल्युलर ब्रॉडबँड नेटवर्क तयार करत आहे, जे स्टारलिंकसारख्या सेवांशी स्पर्धा करेल. ब्ल्यूबर्ड ब्लॉक-२च्या मदतीने स्मार्टफोन व्यावसायिक आणि सरकारी अशा दोन्ही कारणांसाठी थेट उपग्रहांशी कनेक्ट होऊ शकतील. एएसटी स्पेसमोबाईलने सप्टेंबर २०२४ मध्ये ५ ब्ल्यूबर्ड उपग्रह प्रक्षेपित केले आहेत. या कंपनीने जगभरातील ५० हून अधिक मोबाईल ऑपरेटरशी करार केला आहे. ‘बाहुबली’च्या यशामुळे एलन मस्कच्या स्पेस एक्सला पर्याय निर्माण झाला आहे. स्पेस मार्केटमध्ये सगळ्यात स्वस्त रॉकेट प्रक्षेपण कोण करतं याकडे जगाचे लक्ष असते. स्पेस एक्स कंपनी एकच रॉकेट पुन्हा पुन्हा वापरून खर्च कमी करते तर भारताची अंतराळ संशोधन संस्था इस्रो कमी खर्चात रॉकेट तयार करते. त्यामुळे अनेक देश भारताला पसंती देत आहेत. स्पेस एक्सच्या ‘फाल्कन ९’ रॉकेट लाँचची किंमत सुमारे ५५० ते ५६० कोटी आहे. इस्रोच्या एलव्हीएम ३ रॉकेटच्या एका लाँचची किंमत सुमारे ४०० ते ४५० कोटी आहे. इस्रोचे रॉकेट अवकाशात सुमारे ८ हजार ते १० हजार किलो वजन नेऊ शकते. स्पेस एक्सच्या रॉकेटची क्षमता २२ हजार ८०० किलो आहे. स्पेस एक्सचे रॉकेट जादा वजन नेऊ शकते म्हणून त्याचा ‘प्रति किलो’ खर्च कमी होतो. त्यामुळे इस्रोचे रॉकेट थोडे महाग वाटू शकते. पण छोटे रॉकेट्स आणि पीएसएलव्हीबाबत भारत अजूनही जगात सर्वांत स्वस्त पर्यायांपैकी एक आहे. इस्रोचे एलव्हीएम ३ रॉकेट शंभर टक्के यशस्वी आहे. अवकाशात विश्वास हा पैशापेक्षा जास्त महत्त्वाचा आहे. अवकाशात वजन पाठवण्यासंदर्भात प्रति किलो खर्चात मस्कची कंपनी पुढे असली तरी विश्वासाच्या बाबतीत इस्रोला तोड नाही. इस्रोने सर्वांत वजनदार उपग्रह यशस्वीरीत्या प्रक्षेपित केल्यामुळे सा-या जगाचे लक्ष भारताकडे वेधले गेले आहे. व्यावसायिक प्रक्षेपण क्षेत्रात इस्रोने बाजी मारली याचा प्रत्येक भारतीयाला अभिमान आहे.

Printed, Published and Owner by ASHWINI SHRIKANT DAROLE on behalf of Marathi Weekly NIRBHID VARTMAAN, printed at Shree Samarth Printers, Appa Balwant Chowk, Near Prabhat Theatre, 535, Shaniwar Peth, Pune -411030 (Maharashtra) Publish at- 607, Faluni Bldg, Near Icici Bank, NDA Road Near, Uttam Nagar, Shivne, Pune City, Pune - 411023 (Maharashtra) Editor - ASHWINI SHRIKANT DAROLE Cont. No - 9637777003
PRGI NO:- MAHMAR/2023/90686, DECL NO:- SDM/SR/74/2023

मुद्रक, प्रकाशक आणि मालक सौ.अश्विनी श्रीकांत दारोळे, यांचे नावे मराठी साप्ताहिक निर्भीड वर्तमान, श्री समर्थ प्रिंटर्स, अप्पा बळवंत चौक, प्रभात थेअटरच्या शेजारी, ५३५ शनिवार पेठ, पुणे - ४११०३० (महाराष्ट्र). द्वारे मुद्रित करुन आणि प्रकाशन ठिकाण: ६०७, फाल्गुनी बिल्डींग, आयसीआयसीआय बँकेशेजारी, एनडीए रोड, उत्तम नगर, शिवणे, पुणे शहर, पुणे ४११०२३ महाराष्ट्र. संपादक : अश्विनी श्रीकांत दारोळे संपर्क - ९६३७७७७००३ (अंकात प्रकाशित झालेल्या बातम्या लेख व जाहिरात यांचेशी मालक, संपादक सहमत असतीलच असे नाही सदरचे वाद विवाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत)
पीआरजीआई क्र. MAHMAR/2023/90686 डि.क्र:- SDM/SR/74/2023

निर्भीड वर्तमान
शुक्रवार, दि. १ जानेवारी ते ७ जानेवारी २०२६
अहिल्यानगर विशेष ३

# महाराष्ट्राच्या विकासाला 'सुपरफास्ट' गती! नाशिक-सोलापूर-अक्कलकोट सहा पदरी ग्रीनफील्ड कॉरिडॉरला केंद्र सरकारची मंजुरी

**मुंबई:-** महाराष्ट्रातील दळणवळण आणि पायाभूत सुविधांच्या क्षेत्रात क्रांती घडवणारा मोठा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या आर्थिक व्यवहार विषयक मंत्रिमंडळ समितीच्या बैठकीत नाशिक-सोलापूर-अक्कलकोट या ३७४ किमी लांबीच्या ६-पदरी ग्रीनफील्ड क्सेस-कंट्रोल्ड कॉरिडॉरला मंजुरी देण्यात आली आहे. सुमारे १९,१४२ कोटी रुपये खर्चून उभारला जाणारा हा प्रकल्प राज्याच्या आर्थिक नकाशावर मैलाचा दगड ठरणार आहे.




**प्रवासाच्या वेळात मोठी बचत: १७ तास वाचणार**

या नवीन महामार्गामुळे नाशिक ते अक्कलकोट दरम्यानचे अंतर २०१ किमीने कमी होणार आहे. सध्या या प्रवासासाठी लागणाऱ्या ३१ तासांच्या वेळेत तब्बल ४५% घट होऊन तो प्रवास आता केवळ १४ ते १७ तासांत पूर्ण होईल. ताशी १०० किमी वेगाने वाहने धावू शकतील अशा पद्धतीने या मार्गाचे डिझाइन करण्यात आले आहे.

प्रमुख महामार्गांचे होणार 'महाजंक्शन'

**हा ग्रीनफील्ड मार्ग केवळ एक रस्ता नसून तो अनेक महत्त्वाच्या कॉरिडॉर्सना जोडणारा दुवा ठरेल:**

- **दिल्ली-मुंबई एक्सप्रेसवे: वाढवण बंदर इंटरचेंजजवळ जोडणी.**
- **आग्रा-मुंबई कॉरिडॉर: नाशिकमधील आडेगाव जंक्शनवर जोडणी.**
- **समृद्धी महामार्ग: नाशिकजवळील पांगरी येथे जोडणी.**
- **पुणे-नाशिक एक्सप्रेसवे: नाशिक-तळेगाव दिघे हा भाग या दृष्टीनेही महत्त्वाचा ठरेल.**

हा मार्ग पुढे कुर्नूलमार्गे चेन्नई बंदरापर्यंत जोडला जाणार असल्याने, पश्चिम किनारपट्टीपासून पूर्व किनारपट्टीपर्यंत थेट दळणवळण शक्य होईल.

१९,१४२ कोटींची गुंतवणूक आणि प्रचंड रोजगार निर्मिती

'बांधा, वापरा आणि हस्तांतरित करा' या तत्त्वावर हा प्रकल्प राबवला जाणार आहे. या प्रकल्पामुळे राज्याच्या अर्थव्यवस्थेला मोठी चालना मिळणार असून रोजगाराच्या प्रचंड संधी निर्माण होतील:

- **प्रत्यक्ष रोजगार: २५१.०६ लाख मनुष्य-दिवस.**
- **अप्रत्यक्ष रोजगार: ३१३.८३ लाख मनुष्य-दिवस.**

औद्योगिक आणि जिल्ह्यांचा विकास

या कॉरिडॉरमुळे नाशिक, अहिल्यानगर, धाराशिव आणि सोलापूर या चार जिल्ह्यांच्या सर्वांगीण विकासाला गती मिळेल. तसेच, नॅशनल इंडस्ट्रियल कॉरिडॉर अंतर्गत येणाऱ्या कोपर्थी आणि ओरवाकल येथील मालाची वाहतूक अधिक जलद होऊन लॉजिस्टिक क्षमता सुधारणार आहे.

प्रकल्पाची वैशिष्ट्ये एका नजरेत:

**वैशिष्ट्य, तपशील :**

- **एकूण लांबी- ३७४ किलोमीटर**
- **स्तर - ६-पदरी (सहा पदरी)**
- **प्रकार - ग्रीनफील्ड क्सेस-कंट्रोल्ड**
- **एकूण खर्च - १९,१४२ कोटी ।**
- **डिझाइन स्पीड- १०० किमी/तास**
- **मुख्य जिल्हे - नाशिक, अहिल्यानगर, धाराशिव, सोलापूर**

पीएम गतिशक्ती राष्ट्रीय बृहद् आराखड्यांतर्गत हा प्रकल्प एकात्मिक वाहतूक पायाभूत सुविधा विकासाला गती देईल. यामुळे विनाव्यत्यय वाहतूक आणि कमी परिचालन खर्च सुनिश्चित होणार आहे.

---

# अहिल्यानगर जिल्ह्यात १३ जानेवारीपर्यंत शस्त्रबंदी व जमावबंदी लागू; जिल्हा प्रशासनाचा मोठा निर्णय

**अहिल्यानगर:** नवीन वर्षाच्या सुरुवातीला जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था चोख राखण्यासाठी प्रशासनाने कडक पावले उचलली आहेत. अपर जिल्हा दंडाधिकारी दादासाहेब गिते यांनी संपूर्ण अहिल्यानगर जिल्ह्यात १३ जानेवारी २०२६ रोजी रात्री १२ वाजेपर्यंत शस्त्रबंदी आणि जमावबंदीचे आदेश लागू केले आहेत.

**कलम ३७ (१) (३) अन्वये कारवाई**

जिल्ह्यात कोणत्याही प्रकारची अनुचित घटना घडू नये आणि शांतता अबाधित राहावी, या उद्देशाने मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ मधील कलम ३७ (१) (३) नुसार ही बंदी घालण्यात आली आहे. या कालावधीत विनापरवाना जमाव जमवणे किंवा शस्त्र बाळगणे यावर कडक निर्बंध असतील.

**यांना मिळणार आदेशातून सूट**

सर्वसामान्यांची गैरसोय होऊ नये, यासाठी प्रशासनाने काही महत्त्वाच्या बाबींना या आदेशातून वगळले आहे. खालील प्रसंगांसाठी जमावबंदी लागू नसेल:

- **धार्मिक कार्यक्रम व उत्सव.**
- **लग्नसमारंभ व घरगुती कार्यक्रम.**
- **मिरवणुका आणि प्रेतयात्रा.**
- **शासकीय कर्तव्य: कर्तव्यावर असलेले पोलीस अधिकारी, कर्मचारी आणि इतर शासकीय सेवक.**
- **अधिकृत सभा: ज्यांनी सभा किंवा मिरवणुकीसाठी प्रशासनाकडून रीतसर परवानगी घेतली आहे, अशा व्यक्ती.**

**उल्लंघन केल्यास कायदेशीर कारवाई**

जिल्हा दंडाधिकाऱ्यांनी काढलेल्या या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तींविरुद्ध भारतीय दंड संहितेच्या तरतुदींनुसार कठोर कायदेशीर कारवाई केली जाणार आहे. जिल्ह्यातील नागरिकांनी शांतता राखावी आणि प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन अपर जिल्हा दंडाधिकारी दादासाहेब गिते यांनी केले आहे

# ९ जानेवारीपासून भीमाशंकर मंदिर 3 महिन्यांसाठी बंद

**पुणे :** बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असेलेले भीमाशंकर मंदिर काही दिवसांसाठी बंद राहणार आहे. भीमाशंकर मंदिरातील सभामंडप व पायरी मार्गाच्या बांधकाम तसेच भाविकांची सुरक्षितता अबाधित राखण्यासोबतच कामे नियोजनबद्ध व कालमर्यादित पूर्ण करण्याच्यादृष्टीने मंदिर ९ जानेवारी २०२६ पासून पुढील ३ महिन्यांसाठी महाशिवरात्रीचा कालावधी वगळून भाविकांना दर्शनाकरिता बंद करण्यात येणार आहे.

श्री क्षेत्र भिमाशंकर संस्थानने हा निर्णय घेतला आहे. याकरिता भाविकांना सहकार्य करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी जितेंद्र डूडी यांनी केले आहे. मात्र भाविकांच्या सोयी करिता महाशिवरात्रीच्या कालावधीमध्ये मंदीर भाविकांकरिता दर्शनाकरिता खुले राहणार आहे.

राज्य शासनाने १२ ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या श्री क्षेत्र भीमाशंकर मंदिराच्या सर्वांगीण विकासासाठी विशेष विकास आराखड्यास मंजुरी देण्यात आलेली आहे. २३ डिसेंबर रोजी जिल्हा प्रशासन, श्री क्षेत्र भीमाशंकर देवस्थान संस्थानचे विश्वस्त, स्थानिक दुकानदार व भीमाशंकर ग्रामस्थ यांच्या उपस्थितीत संयुक्त बैठकीत सर्वाच्या सहमतीने मंदिर ९ जानेवारीपासून पुढे तीन महिन्यासाठी (महाशिवरात्रीचा १२ ते १८ फेब्रुवारी २०२६ हा कालावधी वगळून) तात्पुरते बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला.

२०२७ मध्ये त्र्यंबकेश्वर, नाशिक येथे सिंहस्थ कुंभमेळ्याचे आयोजन होणार आहे. त्यापूर्वी प्रयागराज येथे झालेल्या महाकुंभ २०२५ च्या अनुभवावरून कुंभमेळ्याच्या काळात नाशिक-त्र्यंबकेश्वर येथे येणाऱ्या लाखो भाविकांकडून श्री क्षेत्र भीमाशंकर येथे दर्शनासाठी मोठ्या प्रमाणावर गर्दी होण्याची शक्यता आहे.

या पार्श्वभूमीवर कुंभमेळ्यापूर्वी आवश्यक पायाभूत सुविधा, सभामंडप, सुरक्षित प्रवेश-निर्गमन व्यवस्था तसेच गर्दी नियंत्रणाची कामे वेळेत पूर्ण करणे हे प्रशासनाचे प्राथमिक उद्दिष्ट आहे. कामाचे स्वरूप व व्याप्ती लक्षात घेता भाविकांची सुरक्षितता अबाधित राखण्यासोबतच कामे नियोजनबद्ध व कालमर्यादित पूर्ण करणे आवश्यक असल्याने मंदिर परिसर भाविकांसाठी तात्पुरता बंद करण्यात येणार आहे.

नित्य पूजा सुरू राहणार: मंदिर दर्शनासाठी बंद असले तरी श्री भीमाशंकर यांची नित्य पूजाअर्चा, अभिषेक व धार्मिक विधी परंपरेनुसार व नियोजित वेळेत सुरू राहतील.

---

# 'लेक वाचवा' अभियानासाठी अहिल्यानगर सज्ज; गर्भातील चिमुकलीच्या रक्षणासाठी गावोगावी स्थापन होणार 'ग्रामसमिती'

**अहिल्यानगर:** जिल्ह्यात मुलींच्या घटत्या जन्मदराचा प्रश्न गंभीर होत असताना, आता स्त्री भ्रूणहत्येला लगाम घालण्यासाठी जिल्हा प्रशासनाने कंबर कसली आहे. जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्या मार्गदर्शनाखाली आता जिल्ह्यातील प्रत्येक गावात 'ग्रामसमिती'ची स्थापना करण्यात आली असून, ११ कलमी विशेष कृती कार्यक्रमाद्वारे मुलींचे स्वागत केले जाणार आहे.




**प्रशासकीय फळी उतरली मैदानात**

जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संजय घोगरे यांनी दिलेल्या माहितीनुसार, या समित्या केवळ कागदावर नसून त्या सक्रिय करण्यासाठी प्रत्येक तालुक्यात विशेष कार्यशाळा घेतल्या जात आहेत. या ग्रामसमितीमध्ये गावातील महत्त्वाच्या घटकांचा समावेश करण्यात आला आहे:

- **सरपंच, ग्रामसेवक आणि तलाठी.**
- **पोलीस पाटील आणि केंद्र प्रमुख (शिक्षण विभाग).**
- **आरोग्य विभागाच्या आशाताई व ए.एन.एम.**

**डॉ. सुधा कांकरिया यांची '११ कलमी' संकल्पना**

'स्त्री जन्माचे स्वागत करा' चळवळीच्या आद्यप्रवर्तक डॉ. सुधा कांकरिया यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम राबविला जात आहे. या अंतर्गत काही नाविन्यपूर्ण योजना राबवल्या जाणार आहेत:

- **२६ जानेवारीचा ठराव: ग्रामसभेत स्त्री जन्माच्या स्वागताचा अधिकृत ठराव करणे.**
- **माहिती फलक: प्रत्येक ग्रामपंचायतीत ० ते ६ वयोगटातील मुला-मुलींची संख्या दर्शविणारा बोर्ड लावणे.**
- **१० रुपयांची जादू: लोकसहभागातून कन्याजन्म सोहळ्यासाठी निधी उभारणे.**
- **ए.एन.सी. ट्रॅकिंग (मैत्री योजना): गर्भवती मातांचे समुपदेशन आणि सामुदायिक डोहाळे जेवण.**
- **नकोशीला करूया 'हवीशी': नकारात्मक नाव असलेल्या मुलींचे सन्मानाने पुनर्नामकरण करणे.**
- **आठवा फेरा: विवाह सोहळ्यात स्त्री जन्माच्या स्वागताचा आठवा फेरा घेण्याचे आवाहन.**

**विज्ञानाची जोड आणि जनजागृती**

कार्यशाळांमध्ये केवळ भावनिक आवाहन न करता वैज्ञानिक सत्यावरही भर दिला जात आहे. मुलगा किंवा मुलगी होणे हे सर्वस्वी पतीच्या गुणसूत्रावर (उर्डोीशी) अवलंबून असते, हे सत्य शालेय विद्यार्थ्यांमार्फत घराघरात पोहोचवण्याचे नियोजन करण्यात आले आहे. जेणेकरून विनाकारण आईला दोषी धरण्याचे प्रकार थांबतील.

**कायदेशीर धाक आणि 'खबरी' योजना**

जिल्हा विधी सल्लागार ड. सारिका सुराशे यांनी पी.सी.पी.एन.डी.टी. (झझझछढ) कायद्याचे सोप्या भाषेत स्पष्टीकरण केले आहे. अवैध लिंग निवडीबाबत माहिती देणाऱ्यांसाठी 'खबरी योजने'ची माहितीही यावेळी देण्यात आली.

**मदत व तक्रारीसाठी संपर्क:**

- **टोलफ्री क्रमांक: १८००-२३३-४४७५ / १०४**
- **अधिकृत संकेतस्थळ:** amchimulgimaha.in

आतापर्यंत जिल्ह्यातील अहिल्यानगर, श्रीरामपूर, कोपरगाव, राहाता, नेवासा यांसह १० तालुक्यांमध्ये या कार्यशाळा यशस्वीपणे संपन्न झाल्या आहेत. डॉ. कांकरिया लिखित 'स्त्री जन्माचे स्वागत करा' या पुस्तकाच्या माध्यमातून लोकशिक्षणाचे कार्य अधिक प्रभावीपणे केले जात आहे.

# नूतन वर्षाच्या स्वागताला गालबोट नको; पिंपरी-चिंचवडमध्ये २४० तळीरामांवर पोलिसांचा 'वेताळ'!

**पिंपरी-चिंचवड:** नूतन वर्ष २०२६ च्या स्वागताचा जल्लोष सुरू असतानाच, सार्वजनिक सुरक्षिततेला प्राधान्य देत पिंपरी-चिंचवड पोलिसांनी मद्यप्राशन करून वाहन चालविणाऱ्यांविरुद्ध धडक कारवाई केली आहे. या विशेष मोहिमेअंतर्गत शहराच्या विविध भागांतून तब्बल २४० वाहनचालकांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

**सुरक्षेसाठी पोलिसांची 'फिल्डिंग'**

वर्षअखेर आणि नवीन वर्षाच्या सुरुवातीला नागरिक मोठ्या उत्साहात बाहेर पडतात. मात्र, या उत्साहाच्या भरात काही वाहनचालक मद्यप्राशन करून वेगाने आणि धोकादायकरित्या वाहने चालवतात. यामुळे निष्पाप नागरिकांचा जीव धोक्यात येऊ शकतो. ही शक्यता ओळखून पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे यांनी कडक कारवाईचे आदेश दिले होते.

**पोलीस प्रशासनाचे आवाहन**

नागरिकांनी सण आणि उत्सव जबाबदारीने साजरे करावेत. मद्यप्राशन करून वाहन चालवणे हा केवळ गुन्हा नसून तो स्वतःच्या आणि इतरांच्या जीवाशी खेळ आहे. न्यायालयीन कारवाई आणि संभाव्य अपघात टाळण्यासाठी वाहनचालकांनी नियमांचे पालन करावे. यापुढेही शहरात अशा मोहिमा सातत्याने राबवल्या जातील.

- **विवेक पाटील,** पोलीस उपायुक्त (वाहतूक शाखा), पिंपरी-चिंचवड.

या मोहिमेचे नियोजन पोलीस सह आयुक्त डॉ. शशीकांत महावरकर व अपर पोलीस आयुक्त सारंग आवाड यांच्या मार्गदर्शनाखाली, वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त विवेक पाटील यांनी केले होते.

**कारवाईचा तपशील: ४७ ठिकाणी नाकाबंदी**

वाहतूक शाखेच्या १३ विभागांमार्फत शहरातील महत्त्वाच्या ४७ ठिकाणी कडक नाकाबंदी लावण्यात आली होती. ब्रेथ नालायझरच्या साहाय्याने तपासणी केली असता खालीलप्रमाणे चालक दोषी आढळले:

- **दुचाकीस्वार: २२०**
- **चारचाकी चालक: २०**
- **एकूण कारवाई: २४० चालक**

या सर्व २४० चालकांविरुद्ध संबंधित न्यायालयात ड्रंक अँड ड्राईव्ह अंतर्गत खटले दाखल करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

# सैनिक कल्याण विभाग भरती: लिपिक टंकलेखक पदासाठी अर्ज करण्यास मुदतवाढ; आता ९ जानेवारीपर्यंत भरता येणार फॉर्म

**मुंबई:** महाराष्ट्र राज्य सैनिक कल्याण विभाग, पुणे अंतर्गत 'लिपिक टंकलेखक' (गट-क) या पदांच्या सरळसेवा भरतीची प्रतीक्षा करणाऱ्या उमेदवारांसाठी एक महत्त्वाची बातमी आहे. तांत्रिक कारणांमुळे ऑनलाइन अर्ज भरण्यास येत असलेली अडचण लक्षात घेऊन, प्रशासनाने अर्ज सादर करण्याची मुदत आता ९ जानेवारी २०२६ रोजी रात्री ११:५९ वाजेपर्यंत वाढवली आहे. मुंबई शहर जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे ही माहिती दिली आहे.

**तांत्रिक बिघाडामुळे घेतला निर्णय**

सैनिक कल्याण विभागामार्फत या पदभरतीसाठी १२ ऑक्टोबर २०२५ रोजी मूळ जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. त्यानंतर ७ डिसेंबर २०२५ रोजी शुद्धिपत्रकही काढण्यात आले होते. मात्र, २६ डिसेंबर २०२५ पासून विभागाचे अधिकृत संकेतस्थळ तांत्रिक कारणास्तव निष्क्रीय (डाऊन) झाले होते. यामुळे अनेक उमेदवारांना अर्ज प्रक्रियेत अडथळे आले. उमेदवारांचे नुकसान टाळण्यासाठी अखेर प्रशासनाने अर्ज करण्यासाठी १० दिवसांची वाढीव मुदत दिली आहे.

**अर्ज करण्यासाठीची अधिकृत लिंक**

उमेदवारांनी कोणत्याही अनधिकृत लिंकवर विश्वास न ठेवता, खाली दिलेल्या अधिकृत वेब लिंकचा वापर करून आपला अर्ज ऑनलाइन पद्धतीने सादर करावा:

अर्ज भरण्यासाठीची पूर्ण लिंक: https://cdn3.digialm.com/EForms/configuredHtml/32786/96173/Index.html

**उमेदवारांसाठी महत्त्वाच्या टिप्स:**

- **※ अंतिम मुदत: ९ जानेवारी २०२६ (रात्री ११:५९ वाजेपर्यंत).**
- **※ पात्रता: अर्ज करण्यापूर्वी १२ ऑक्टोबर २०२५ ची मूळ जाहिरात आणि ७ डिसेंबर २०२५ चे शुद्धिपत्रक वाचून पात्रता तपासून घ्यावी.**
- **※ वेळेचे नियोजन: शेवटच्या दिवशी तांत्रिक लोड वाढण्याची शक्यता असल्याने उमेदवारांनी अंतिम तारखेची वाट न पाहता लवकरात लवकर अर्ज सादर करावा.**

ज्या इच्छुक उमेदवारांचे अर्ज अद्याप तांत्रिक अडचणीमुळे प्रलंबित होते, त्यांनी या संधीचा लाभ घेऊन तातडीने वरील लिंकवरून अर्ज पूर्ण करावेत, असे आवाहन सैनिक कल्याण विभागामार्फत करण्यात आले आहे.

# थंडीचा पारा चढला!

- **राज्यातील लाट ओसरली**

**पुणे -** राज्यातील किमान तापमानात एक ते दोन अंशाने वाढ झाल्यामुळे मध्य महाराष्ट्रासह विदर्भातील थंडीची लाट ओसरत आहे. तर अहिल्यानगर, पुणे, नाशिक, मालेगाव आणि विदर्भातील गोंदिया जिल्ह्यात किमान तापमान ९ अंशापर्यंत खाली नोंदविल्यामुळे गारठा चांगलाच जाणवत आहे. तर अन्य जिल्ह्यातील थंडीचा पारा १० ते ११ अंशाच्या पुढे गेला आहे.राज्यातील मध्य महाराष्ट्रासह विदर्भातील बहुतांश जिल्ह्यात किमान तापमान ६ अंशाच्या खाली नोंदविल्यामुळे थंडीची लाट आली आणि हुडहुडीने महाराष्ट्र गारठला होता.

मात्र, मागील दोन ते तीन दिवसांपासून किमान तापमान दोन ते तीन अंशाने वाढ झाल्यामुळे पारा ९ अंशावर आला, तर काही जिल्ह्यांतील पारा ११ ते १२ अंशाच्या पुढे गेल्यामुळे थंडीचा जोर ओसरू लागला आहे. मध्य महाराष्ट्रातील अहिल्यानगर, पुणे, नाशिक, मालेगाव, तर विदर्भातील गोंदिया आणि यवतमाळ जिल्ह्यातील किमान तापमान ९ अंशापर्यंत नोंदविले.

परिणामी या जिल्ह्यात हुडहुडी कायम असून, अन्य जिल्ह्यात मात्र हुडहुडी कमी झाल्यामुळे नागरिकांना काहीसा दिलासा मिळाला आहे. दरम्यान, पुढील दोन दिवस राज्यातील किमान तापमानात फारसा बदल होणार नसून, थंडीचा जोर कायम राहील, असा अंदाज भारतीय हवामानशास्त्र विभागाकडून वर्तविण्यात आला.

# भाजपचे माजी नगरसेवक उदय जोशी यांचे ससूनमध्ये निधन

**पुणे :** ठेवीदारांची फसवणूक केल्याप्रकरणी येरवडा कारागृहात असलेले भारतीय जनता पक्षाचे माजी नगरसेवक उदय जोशी (वय ६३) यांचे शुक्रवारी सकाळी ससून रुग्णालयात उपचारादरम्यान निधन झाले. जोशी हे वर्षभरापासून कारागृहात न्यायालयीन कोठडीत होते. आजारपणामुळे त्यांनी जामीन मिळवण्यासाठी त्यांनी न्यायालयात अर्ज केला होता. मात्र, सुनावणीपूर्वीच त्यांचे निधन झाले.

ठेवीदारांची पाच कोटी ७३ लाखांची फसवणूक केल्याप्रकरणी भाजपचे माजी नगरसेवक, सदाशिव पेठेतील निनाद नागरी सहकारी पतसंस्थेचे संस्थापक उदय जोशी, त्यांचा मुलगा मयुरेश यांच्यासह सात जणांविरुद्ध विश्रामबाग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. जोशी यांच्या मुलाने सिंहगड रस्ता परिसरात गॅस वितरण एजन्सीत गुंतवणूक केल्यास चांगला परतावा मिळेल, असे आमिष दाखवून पैसे घेतले होते.

पैसे घेतल्यानंतर परतावा न दिल्याप्रकरणी विश्रामबाग ठाण्यात उदय जोशी, त्यांचा मुलगा यांच्यासह सात जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. याप्रकरणात त्यांच्याविरुद्ध चार गुन्हे दाखल झाले होते.

# मानवतेच्या मार्गावर चालण्यासाठी कृतीतून संकल्प करूया

- **वीर बाल दिवसानिमित्त साहिबजाद्यांच्या शौर्याला नमन**

**मुंबई :** शीख पंथीयांचे दहावे गुरु श्री गुरु गोविंद सिंगजी यांचे सुपुत्र साहिबजादे बाबा जोरावर सिंग (वय ९ वर्षे) आणि साहिबजादे बाबा फतेह सिंग (वय ७ वर्षे) यांच्या अद्वितीय शौर्य व बलिदानाच्या स्मरणार्थ २६ डिसेंबर हा दिवस 'वीर बाल दिवस' म्हणून पाळला जातो. वीर बाल दिवसाच्या निमित्ताने गुरूंनी दाखविलेल्या मानवतेच्या मार्गावर चालण्यासाठी आणि त्यांच्या विचारांना आपल्या जीवनात अंगीकारण्यासाठी आपण स्वतःला कृतीतून संकल्पित केले पाहिजे. साहिबजाद्यांच्या धैर्याने आणि बलिदानाने भारतीय इतिहासाला नवी दिशा दिली असून, त्यांचे शौर्य सदैव पिढ्यान्पिढ्यांना प्रेरणा देत राहील, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितले.



सायन येथील गुरुद्वारा गुरू तेग बहादूर दरबार येथे वीर बाल दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वीर शहीद साहिबजादे यांना विनम्र अभिवादन करून त्यांच्या अद्वितीय शौर्याचे स्मरण केले. यावेळी गुरुद्वारा समितीच्या सदस्यांनी किर्तन, कविता वाचन केले आणि वीर शहीद साहिबजादे यांना आदरांजली अर्पण केली.

यावेळी आमदार प्रसाद लाड, आमदार तमिल सेल्वन, श्री गुरु तेग बहादूर यांच्या ३५० व्या शहीदी समागम समितीचे राज्यस्तरीय समन्वयक रामेश्वर नाईक, पंजाबी साहित्य अकादमीचे कार्याध्यक्ष बल मलकित सिंह, गुरुद्वारा समितीचे सदस्य दलजीत सिंग, गुरुदेव सिंग, जसपाल सिंग सिद्धू, हॅपी सिंग, डॉ. अजयसिंग राठोड यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बल मलकीत सिंग यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे स्वागत केले. शासनाच्या पुढाकाराने गुरुंच्या गौरवशाली इतिहासाला उजाळा मिळत असल्याचे नमूद करुन या उपक्रमासाठी बल मलकित सिंग यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांचे आभार मानले.

# हॉटेल्स व आस्थापनांमध्ये सखोल तपासणीचे अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांचे निर्देश

- **नववर्ष स्वागताच्या पार्श्वभूमीवर अन्न व औषध प्रशासन सतर्क**

**मुंबई :** नववर्षाचे आगमन, उत्सव आणि ३१ डिसेंबरच्या पार्श्वभूमीवर हॉटेल्स, उपहारगृहे व खाद्य आस्थापनांमध्ये तयार होणारे अन्न स्वच्छ, सुरक्षित व निर्भेळ असणे आवश्यक आहे. यासाठी अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील रेस्टॉरंट्स, हॉटेल्स आणि खाद्य आस्थापनांची सखोल तपासणी करावी, असे निर्देश अन्न व औषध प्रशासन आणि विशेष सहाय्य विभागाचे मंत्री नरहरी झिरवाळ यांनी दिले.

नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने हॉटेलमधील स्वच्छतेला विशेष महत्त्व असून यासंदर्भात हॉटेल व्यावसायिकांमध्ये जनजागृती व प्रबोधन करावे. तपासणीदरम्यान मुदतबाह्य कच्च्या मालाचा वापर, अन्नपदार्थांमध्ये खाद्य व अखाद्य रंगांचा वापर, तसेच स्वच्छतेच्या निकषांचे पालन होत आहे की नाही, याची काटेकोर तपासणी केली जाईल. यासाठी अन्न व औषध प्रशासन विभागाने राज्यभर मोठी मोहीम हाती घेतली असल्याचे मंत्री झिरवाळ यांनी स्पष्ट केले. उत्तम स्वच्छता व अन्नसुरक्षा मानकांचे पालन करणाऱ्या हॉटेल आस्थापनांना प्रोत्साहन देण्यासाठी जिल्हा व राज्यस्तरावर उत्कृष्ट हॉटेल्सना पुरस्कार देण्यात येणार आहेत. जिल्हास्तरावरील पुरस्कार २६ जानेवारी २०२६ रोजी संबंधित जिल्ह्याचे पालकमंत्री यांच्या हस्ते प्रदान करण्यात येतील, तर राज्य स्तरावर उत्कृष्ट ठरलेल्या हॉटेल्सचा सन्मान मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात येणार असल्याची माहिती मंत्री नरहरी झिरवाळ यांनी दिली.

# 'प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कारा'ने देशातील वीर मुलांचा सन्मान

नवी दिल्ली. दि. २६ : वीर बालदिनाचे औचित्य साधून राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते आज देशातील २० मुलांना प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्काराने(२०२५) सन्मानित करण्यात आले.

विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील कामगिरीसाठी छत्रपती संभाजी नगर येथील अर्णव महर्षींना गौरविण्यात आले. महिला व बालविकास मंत्रालयातर्फे राष्ट्रपती भवनातील सांस्कृतिक केंद्रात आयोजित समारंभात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी सात क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीसाठी देशभरातील २० बालकांना २०२५ या वर्षासाठीचे प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कार प्रदान केले.

शौर्य, विज्ञान-तंत्रज्ञान, कला-संस्कृती, समाजसेवा, क्रीडा आणि पर्यावरण अशा क्षेत्रांतील उल्लेखनीय कामगिरीबद्दल या बालकांना गौरविण्यात आले. यापैकी दोघांना मरणोत्तर हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. या पुरस्कारार्थींमध्ये मध्ये ९ मुले आणि ११ मुलींचा समावेश आहे. यावेळी केंद्रीय महिला व बाल विकास मंत्री अन्नपूर्णा देवी, राज्यमंत्री सावित्री ठाकूर आणि मंत्रालयाचे सचिव अनिल मलिक उपस्थित होते.

**महाराष्ट्राच्या अर्णव महर्षींचा गौरव**

महाराष्ट्रातील छत्रपती संभाजीनगर येथील १७ वर्षीय अर्णव महर्षी यास विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रातील उत्कृष्ट योगदानासाठी प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कार' प्रदान करण्यात आला. लकवाग्रस्त रुग्णांच्या हातांसाठी -खं-आधारित पुनर्वास उपकरण आणि ॲक्टिव्ह हँड रिस्ट बँड तयार करणाऱ्या अर्णव महर्षी याने स्मार्टफोन किंवा लॅपटॉपच्या मदतीने हे नवोन्मेषी उपकरण विकसित केले आहे.